।। श्री वृध्देश्वर प्रसन्न ।।







# श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.

आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

# ४६ वा वार्षिक अहवाल

आणि

दि. ३१ मार्च २०१७ रोजीचा

# ताळेबंद

व

२०१६-२०१७

# नफा तोटा पत्रक



Scanned by CamScanner

# विद्यमान संचालक मंडळ

| अ.नं. | संचालकाचे नांव | पद | गांव |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. आप्पासाहेब दादाबा राजळे<br>डी ई ई. | चेअरमन | कासार पिंपळगाव |
| २ | मा. श्री. रामकिसन काशिनाथ काकडे | व्हा. चेअरमन | धामणगांव |
| ३ | मा. आ. श्री. राजीव आप्पासाहेब राजळे<br>बी. आर्च. | संचालक | कासार पिंपळगांव |
| ४ | मा. श्री. उध्दवराव रघुनाथ वाघ<br>एम.एस्सी. ॲग्री. | संचालक | जवखेडे खालसा |
| ५ | मा. श्री. चारुदत्त उध्दवराव वाघ | संचालक | जवखेडे खालसा |
| ६ | मा. श्री. सुभाष बाबुराव ताठे | संचालक | चितळी |
| ७ | मा. श्री. ॲड. अनिल शिवाजी फलके<br>बी.एस.एल., एल एल.बी | संचालक | सुलतानपुर |
| ८ | मा. श्री. साहेबराव बाजीराव देशमुख | संचालक | कोरडगांव |
| ९ | मा. श्री. श्रीकांत एकनाथ मिसाळ<br>बी.ए. | संचालक | सुसरे |
| १० | मा. श्री. सुभाष मारुती बुधवंत<br>बी.ए. | संचालक | शिरापुर |
| ११ | मा. डॉ. श्री. बाबासाहेब बलभिम मचे<br>बी.ए.एम.एस. | संचालक | मोहोज बु. |
| १२ | मा. श्री. शरद हरिभाऊ अकोलकर | संचालक | करंजी |
| १३ | मा. श्री. त्रिंबक हरिभाऊ खेडकर | संचालक | चिंचपुर इजदे |
| १४ | मा. श्री. पांडूरंग आबाजी खेडकर<br>एम.ए., बी.लिब.एस्सी | संचालक | भालगांव |
| १५ | मा. श्री. सुभाष भुजंगराव अंदुरे<br>बी.एस्सी. ॲग्री. | संचालक | खरवंडी कासार |
| १६ | मा. श्री. भगवान कोंडीबा पाचरणे | संचालक | दुलेचांदगांव |
| १७ | मा. श्री. कोंडीराम रामजी नरोटे | संचालक | मोहरी |
| १८ | मा. सौ. सिंधुबाई महादेव जायभाये | संचालिका | येळी |
| १९ | मा. श्री. वच्छलाबाई कारभारी कचरे | संचालिका | पाडळी |
| २० | मा. श्री. राहुल आप्पासाहेब राजळे | तज्ञ संचालक | कासार पिंपळगांव |
| २१ | मा. श्री. बाबासाहेब रंगनाथ किलबिले | तज्ञ संचालक | औरंगपुर |
| २२ | मा. श्री. नारायण तुकाराम बर्डे | कार्यलक्षी संचालक | कासार पिंपळगांव |
| २३ | मा. प्रादेशिक सहसंचालक (साखर) | शासन प्रतिनिधी | अहमदनगर |
| २४ | मा.श्री. जे. आर. पवार<br>बी.कॉम. (ऑनर्स) | कार्यकारी संचालक | आदिनाथनगर |



Scanned by CamScanner

श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.
आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

# आशीर्वाद



## स्व. दादापाटील राजळे

१९२२ – २००६

संस्थापक – चेअरमन

Scanned by CamScanner

# चेअरमन



## मा. आप्पासाहेब राजळे

Scanned by CamScanner

श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.
आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

# नेतृत्व



## मा. सौ. मोनिकाताई राजळे

विधानसभा सदस्य, शेवगाव–पाथर्डी मतदार संघ

Scanned by CamScanner

## श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि.,आदिनाथनगर

ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक | : | कारखाना कार्यालय-(०२४२८)-२४५०४२, २४५०६६, २४५१४२ |
| फॅक्स नंबर | : | (०२४२८) २४५२६४, २४५३५५ |
| ई-मेल | : | vridheshwar@gmail.com |
| शेतकी विभागीय कार्यालय | : | पाथर्डी - (०२४२८)२२२३४०, कोरडगांव -(०२४२८) २५२०५३ |
| पोस्ट | : | वृद्धेश्वर साखर कारखाना, पिनकोड - ४१४ ५०५ |
| तालुका | : | पाथर्डी |
| जिल्हा | : | अहमदनगर (महाराष्ट्र) |
| रेल्वे स्टेशन (नजिकचे) | : | अहमदनगर (सेंट्रल रेल्वे) |
| नोंदणी क्रमांक | : | एएनजी/पीआरजी/(ए) २९ |
| नोंदणी दिनांक | : | १०/०२/१९७० |
| औद्योगिक परवाना क्रमांक | : | सी.आय.एल./१२३ (९४), नवी दिल्ली, दि.१४/१२/१९९४ |
| मॅन्युफॅक्चरींग परवाना क्रमांक | : | एल.४नं.-टी.आय./६८/७६ |
| केंद्रीय विक्रीकर नोंदणी क्रमांक व दिनांक | : | २७५००१२८२९५-सी दि.०१/०४/२००५ |
| महा विक्रीकर नोंदणी क्रमांक | : | २७५००१२८२९५-व्ही दि.०१/०४/२००५ |
| ऊस खरेदीकर परवाना क्रमांक | : | एल-५८ दिनांक १९ ऑक्टोबर १९७७ |
| कारखाना परवाना क्रमांक | : | ०५२८६ |
| स्थायी आयकर क्रमांक (पॅन नंबर) | : | अे अे बी सी व्ही ०७८२ ई. |
| टी.डी.एस. आयकर क्रमांक | : | पी.एन.ई.एस.-११८४०डी |
| केंद्रीय अबकारी कर नोंदणी क्रमांक | : | अे अे बी सी व्ही ०७८२ ई एक्स एम ००१ |
| सेवाकर नोंदणी क्रमांक | : | अे अे बी सी व्ही ०७८२ ई एस टी ००१ |
| **जी. एस. टी. क्रमांक** | : | **२७ अे अे बी सी व्ही ०७८२ ई १ झेड एफ** |

२०१६-१७

४६ वा वार्षिक अहवाल

आणि

दि. ३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद,



Scanned by CamScanner

## श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.,आदिनाथनगर

ता. पाथर्डी , जि . अहमदनगर

# ॥ श्रद्धांजली ॥

*अहवाल सालात व तद्नंतर भारतातील*

*व आंतरराष्ट्रीय स्तरावरील थोर नेते, देशभक्त, शास्त्रज्ञ, संशोधक, जवान, कलावंत, साहित्यिक,*

*शिक्षणतज्ञ, सामाजिक व सहकारी कार्यकर्ते,*

*स्वातंत्र्यसेनांनी, लेखक तंत्रज्ञ, खेळाडू, व कवी*

*तसेच नैसर्गीक आपत्तीमुळे प्राणहानी झालेल्या व्यक्तींना*

*तसेच आपले कारखान्याचे सभासद, सेवक, ठेवीदार, ऊस तोडणी/वाहतूक मजूर, ठेकेदार*

*व हितचिंतक दिवंगत झाले*

*त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.*

*ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो,*

*अशी ईश्वरचरणी नम्र प्रार्थना !*







Scanned by CamScanner

# श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना लि.,आदिनाथनगर

ता. पाथर्डी, जि. अहमदनगर

## २०१६-१७ वर्षाचा
## ४६ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,

२०१६-१७ वर्षाच्या ४६ व्या अधिमंडळाचे वार्षिक सर्व साधारण सभेस आपण आवर्जून उपस्थित राहिलात, त्याबद्दल संचालक मंडळाचे वतीने प्रथमतः मी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.

दि.३१/०३/२०१७ रोजीचा ताळेबंद व २०१६-१७ वर्षाचे नफा-तोटा पत्रक, तसेच अहवाल सालातील संचालक मंडळ कामकाजाचा अहवाल सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

कारखान्याचा २०१६-१७ गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन कारखान्याचे सभासद मा. श्री. शिवदास दादा काटे व मा. सौ. निर्मलताई शिवदास काटे या उभयतांचे शुभहस्ते विधीवत पूजा होऊन दि. २३/१०/२०१६ रोजी संपन्न झाला.

कारखान्याचा २०१६-१७ गळीत हंगामाचा शुभारंभ दि. ०६/११/२०१६ रोजी मा. श्री. राजीवजी राजळे मा., संचालक दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. ऑप. बँक लि., व मान. आमदार सौ. मोनिकाताई राजीव राजळे या उभयतांच्या शुभहस्ते आणि मा. श्री. आप्पासाहेब राजळे मा. चेअरमन यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन प्रत्यक्ष ऊस गाळपास दि.०६/११/२०१६ रोजी सुरुवात झाली.

**सभा-**

अहवाल सालात कारखाना कामकाजाच्या सोईनुसार खालीलप्रमाणे सभा घेण्यात आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | अधिमंडळाची वार्षीक सर्वसाधारण सभा | ०१ |
| २) | संचालक मंडळ सभा | ०६ |
| ३) | संचालक मंडळ चक्रांकित सभा | ०६ |
| ४) | कार्यकारी मंडळ सभा | ०४ |
| ५) | साखर विक्री समिती सभा | ५६ |

**अर्थ सहाय्य :-**

दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., अहमदनगर यांनी कारखान्यास आवश्यकतेनुसार वेळेवर खेळते भांडवली कर्ज पुरवठा केलेला आहे.

**भाग भांडवल :-**

अहवाल सालाचे सुरुवातीस सभासद वसूल भाग भांडवल रक्कम रु. ९०१.४९ लाख असून २०१६-१७ वर्षामध्ये रक्कम रु. ६३.५८ लाख वाढ होवून एकुण भाग भांडवल रक्कम रु. ९६५.०८ लाख वसूल झाले आहे.

पोटनियम दुरुस्तीनुसार प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. १०,०००/- झालेली आहे. कारखान्याने चिपाडापासून सहविज निर्मितीसह अनुषंगिक मशिनरी आधुनिकरण उभारणी प्रकल्प हाती घेतला आहे. त्यामुळे स्वभाग भांडवलाची उभारणी करावी लागणार आहे. म्हणजे वित्तीय संस्थाकडून सदरचा प्रकल्प उभारणीसाठी कर्ज उपलब्ध होणे सोईचे होईल.करिता अद्याप ज्या सभासदांच्या भागाची रक्कम अपूर्ण आहे त्यांनी भागाची रक्कम भरणा करणे गरजेचे आहे. अद्याप भागाची अपूर्ण रक्कम मोठ्या प्रमाणावर येणे आहे अपुर्ण रक्कम भरणा करणेबाबत वेळोवेळी सभासदांना सूचविण्यात/कळविण्यात आलेले आहे. तेव्हा सभासदांनी भागाची अपूर्ण रक्कम त्वरीत भरणा करावी.



Scanned by CamScanner

**२०१६-१७ गाळप हंगाम :-**

मागील सलग तीन वर्षात कारखाना कार्यक्षेत्रात फारच कमी प्रमाणात पाऊस झालेला होता त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा होत असलेल्या मुळा धरणामधील पाणी साठा देखील कमी झालेला होता व त्यामुळे मुळा कालव्यामधून नियमित आवर्तन न मिळाल्यामुळे आवश्यक प्रमाणात पाणीपुरवठा झालेला नाही. त्याचा ऊस लागवडीवर अनिष्ट परिणाम झाला. त्यामुळे कार्यक्षेत्रामध्ये ऊस उपलब्धता कमी झाली मात्र अशाही परिस्थितीमध्ये कारखान्याने या हंगामात एकूण ९६,४७८.५०१ मे. टन ऊस गळीत केलेले असुन. सरासरी साखर उतारा ८.३९% मिळालेला आहे तसेच ८१,२७५ क्विंटल साखर उत्पादन केलेली आहे.

**ऊस किंमत :-**

केंद्र शासनाने २०१६-१७ गळित हंगामाकरीता आपले कारखान्याचा वाजवी व किफायतशिर दर / एफ.आर.पी. प्र.मे.टन रूपये २,४५२.४६ कारखाना गेट पोहोच निश्चित केला. त्यामधुन सरासरी ऊसतोडणी वाहतुक खर्च प्र.मे.टन रूपये ५७३.९२ वजा जाता निव्वळ ऊस दर प्र. मे. टन रु. १,८७८.५४/- इतका येत असून कारखान्याने या हंगामातील ऊस गाळपास प्र. मे. टन. रु. २,३००.०० प्रमाणे दर दिलेला आहे.

**ऊस विकास :-**

२०१६-१७ हंगामामध्ये कारखाना कार्यक्षेत्रात सरासरी ७०४ मि.मि. पाऊस झाला. त्यामुळे ऊस जोपासणे बरोबरच नविन ऊस लागवड फार मोठ्या प्रमाणात झाली. तसेच कारखाना कार्यक्षेत्रामध्ये चांगले पर्जन्यमान झालेमुळे ऊस लागवड वाढणार आहे परंतू कार्यक्षेत्रामध्ये बेणेचा तुटवडा असलेमुळे कार्यक्षेत्रामधील सभासद व बिगर सभासद शेतकऱ्यांना प्रति एकरी रु. १,०००/-बेणे वाहतूक अनुदान खर्च कारखान्याने केलेला आहे सदरची योजना माहे जानेवारी २०१७ अखेर पर्यंत होती २०१७-१८ चे गळीत हंगामा करीता गाळपासाठी ऊस उपलब्ध होणेसाठी दुष्काळी परिस्थितीतही खोडवा जोपासणीसाठी व्यवस्थापनाने कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांचे मेळावे घेऊन ऊसातील पाचट न जाळता सरीत पसरणे, याशिवाय महत्वाचे म्हणजे ठिबक सिंचन योजना प्रभाविपणे राबविणेत येत असून त्यासाठी भारतीय स्टेट बँकेमार्फत शेतकऱ्यांना कारखान्याचे हमीवर सुलभ कर्ज पुरवठा होत आहे. यासाठी ऊस उत्पादकांनी अपेक्षीत प्रतिसाद दिला आहे.

महाराष्ट्र शासन, राज्यस्तरावर पुढील तीन वर्षात टप्प्याटप्याने संपूर्ण ऊस लागवड ठिबक सिंचनाअंतर्गत होण्याचे दृष्टीने कायदा करणेसाठी आराखडा तयार करीत असून याबाबत लवकरच धोरणात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे. याबरोबरच कारखान्यांना गाळप परवाना देतांना देखील या बाबीचा विचार करूनच गाळप परवाना देणेबाबतचे धोरण ठरविण्यात येणार आहे. तेंव्हा ऊस उत्पादकांना आवाहन करण्यात येते की, टप्प्याटप्याने ठिबक सिंचनाखाली संपूर्ण ऊस लागवड करण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीस जोमाने सुरूवात करावी. जेणे करूण कायदा अंमलात आल्यास एकदाच ठिबकसिंचन घेणे अडचणीचे होवू नये यासाठी कारखान्याने हाती घेतलेल्या योजनेचा जास्तीत जास्त ऊस उत्पादकांनी लाभ घ्यावा.

**ऊस विकास योजना :-**

केंद्र पुरस्कृत ऊस उत्पादकता वाढ योजनेअंतर्गत कारखान्याने कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना जमिनीची जैविक सुपीकता वाढविण्याकरीता धैंचा व ताग बियाणे पुरवठा केलेला आहे. याशिवाय वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु., ता. हवेली, जि. पुणे, महात्माफुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ऊस संशोधन केंद्र पाडेगांव, इत्यादी ठिकाणाहून पायाभूत,मुलभूत आणि प्रमाणित ऊस बेणे आणून त्याचा ७.०० हे. क्षेत्रासाठी पुरवठा केलेला आहे. तसेच केंद्रपुरस्कृत योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना फेरस सल्फेट, मॅग्नेशियम, बोरॉन, झिंक सल्फेट, कॉपर सल्फेट, गंधक इत्यादी सुक्ष्म मुलद्रव्य खते ५०% अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेले आहे.

शेतकऱ्यांना ऊस पिकासाठी जमिनीमध्ये अंतर्गत मशागतीसाठी सुधारीत कृषि औजारे, खतदाणी (पहार) व धारदार कोयता इत्यादी साहित्य अनुदानावर वाटप करण्यात आलेले आहेत.



Scanned by CamScanner

**माती परीक्षण :-**

राष्ट्रीय शास्वत शेती अभियानअंतर्गत तालुका कृषि कार्यालय, पाथर्डी यांचेकडून माती परिक्षण प्रयोगशाळा (कीट) कारखाना कार्यस्थळावर सुरु केली असून शेतकऱ्यांकडून नाममात्र फी घेवून माती परिक्षण करुण देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्याचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.

**ऊस बेणे वाहतूक अनुदान योजना :-**

ऊस लागण हंगाम २०१६-१७ मध्ये कारखाना कार्यक्षेत्रामध्ये व कार्यक्षेत्राबाहेर ऊस बेणे उपलब्धता कमी प्रमाणात असल्यामुळे ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ऊस बेणे, ऊस बेणेची तोडणी व वाहतूक करणे इ. अडचणी येत आहेत. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रामध्ये कारखान्यामार्फत आडसाली व पूर्व हंगामी या दोन हंगामात २००० हे. (५००० एकर) क्षेत्रावर ऊस लागवडीचे उद्दीष्ट ठरविलेले होते त्यामुळे कारखान्याने ऊस लागवडीस चालना मिळावी म्हणून खालीलप्रमाणे ऊस बेणे वाहतूक अनुदान वाटप केलेले आहे.

| ऊस लागवड क्षेत्र हे. | अनुदान रक्कम रु. |
|---|---|
| ०.२० | ५००/- |
| ०.३० | ७५०/- |
| ०.४० | १०००/- |

वरीलप्रमाणे प्रति एकर रु. १०००/- ऊस बेणे वाहतूक अनुदान वाटप करण्याचे धोरण घेतले होते. ही योजना दि. ०१/०८/२०१६पासून लागु केलेली असून या योजनेमुळे कारखान्यास रक्कम रु. २९.६६ लाख खर्च आलेला आहे. सदरचे योजनेमुळे कारखान्यास पुढील सलग दोन ते तीन हंगामामध्ये २.०० लाख मे. टन ऊस उपलब्ध होणार आहे.

**सभासद विमा योजना :-**

आपले कारखान्याने सर्व सभासदांचा प्रत्येकी रक्कम रु. २५,०००/- चा अपघाती विमा उतरविला असून अपघाती निधन झालेल्या सभासदांचे वारसास प्रत्येकी रक्कम रु. २५,०००/- प्रमाणे विमा कंपनीकडून कारखान्यामार्फत आदा करणेत येत आहे.

**ऊस तोडणी वाहतूक मजूर विमा :-**

श्री वृध्देश्वर ॲग्री. प्रोड्यूस ट्रान्सपोर्ट प्रा. लि., मार्फत कारखान्याचे ऊस तोडणी व वाहतूकीचे काम करीत असलेल्या मजूरांचा अपघात, आजारपण व झोपडी (कोपी) आणि बैलजोडीचा विमा घेणेत आला आहे. त्यांना खालील प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम विमा कंपनीकडून श्री वृध्देश्वर ॲग्री. प्रोड्यूस ट्रान्सपोर्ट प्रा. लि., मार्फत आदा करणेत आली आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | बैल मृत्यु | ०८ | १,७१,०००/- |
| २) | बैल मोडला | ०७ | ६२,०००/- |
| | एकूण | १५ | २,३३,०००/- |



Scanned by CamScanner